नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. २**
**मे २००९**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. १८ मे २००९ रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजीमहाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**<u>विषय क्र. ७</u>**

दि. १/४/२००९ पासून वैद्यकिय कारणामुळे तीन महिने म.न.पा. मुख्य सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने सदर कालावधीची रजा मान्य करणेबाबतचे मा. सौ. अश्विनी कदम यांचे दि. १५/४/२००९ चे पत्र.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–८/५/२००९.

**सुनिल पारखी,**
**उपनगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :–१८/५/२००९

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये सोमवार दि. १८/५/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे मे २००९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. १/८**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/एचओ/१४९९ दि. २६/२/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. २३३९ दि. २४/३/२००९.
३) मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता, मा.शाम देशपांडे व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. १२/५/२००९ चे फेरविचाराचे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. १०९ दि. १२/५/२००९.

–––

स्थायी समिती ठराव क्र. २३३९ दि. २४/३/२००९ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

केंद्र शासन अनुदानित प्रकल्पाअंतर्गत काम करुन घेणारे मे.एन.बी.सी.सी.यांचेसमवेत सामंजस्य करार (Memorandom of Understanding) करणेस व प्रकल्प राबविणेस मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. यांचेबरोबर सवलतीचा करारनामा (Concession Agreememt) करणेस व ५ वर्षाचे कालावधीनंतर त्यांना लॅंडफिल डेव्हलपमेंट व लॅंडफिल मेन्टेनन्स पोटी फी अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मे.एन.बी.सी.सी.या संस्थेची केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थानातंर्गत करावयाच्या कामांसाठी नेमणूक केलेली असल्याने त्यांचेबरोरबर सामंजस्य करार (Memorandom of Understanding) करणेस

२) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि. या कंपनीबरोबर मे.एन.बी.सी.सी.यांनी मागविलेल्या निविदातील अटी व शर्तीनुसार सवलतीचा करारनामा करणे व प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी त्यांचेकडून मोफत चालवून घेणेस व त्यापुढील कालावधीसाठी नमूद केल्याप्रमाणे फी आदा करणेस

३) मे.हंजर बायोटेक एनर्जीस प्रा.लि.यांना लॅंडफिल डेव्हलपमेंट व लॅंडफिल मेन्टेनन्स पोटी मनपाने प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे फी अदा करणेस

| अ.क्र. | कालावधी | फी दर |
|---|---|---|
| १ | १ ते ५ वर्षे | नाही. |
| २ | ६ ते १० वर्षे | र.रुपये ५५/– प्रति मे.टन |
| ३ | ११ ते १५ वर्षे | र.रुपये ६०/– प्रति मे.टन |
| ४ | १६ ते २० वर्षे | र.रुपये ६७/– प्रति मे.टन |
| ५ | २१ ते २५ वर्षे | र.रुपये ७४/– प्रति मे.टन |
| ६ | २६ ते ३० वर्षे | र.रुपये ८२/– प्रति मे.टन |

**<u>विषय क्रं. २/९</u>**

संदर्भ :– १) मा.प्र.नगरसचिव यांचे क्र. ३४५ दि. १२/५/२००९ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १११, दि. १२/५/२००९.

–––

मा.प्र.नगरसचिव यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

नगरसचिव कार्यालयाकडील खाली नमूद केल्याप्रमाणे सेवकांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(२) अन्वये बढतीने नेमणूक करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| क्र. | सेवकाचे नाव | सध्याचे पद व वे.श्रे. | बढतीचे पद व वे.श्रे. | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.पुरंदरे विनोद. | वरिष्ठ लघुलेखक (वे.श्रे.६५०० – १४७५० + मान्य भत्ते + मान्य वि. वे.) | निवडश्रेणी लघुलेखक (वे.श्रे.रू.८०००–१६७५० + मान्य भत्ते + मान्य वि.वे.) | श्री.चव्हाण रघुनाथ यांच्या सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणा–या जागेवर बढतीने नेमणूक. |
| २ | श्री.वाघ कैलास. | स्टेनोग्राफर (वे.श्रे.रू.५५०० – १२८५०+मान्यभत्ते + मान्य वि. वे) | वरिष्ठलघुलेखक (वे.श्रे.रू. ६५००–१४७५०+मान्य भत्ते +मान्य वि.वे.) | श्री. पुरंदरे विनोद यांच्या बढतीने रिक्त होणा–या जागेवर बढतीने नेमणूक. |

**<u>विषय क्रं. ३/१०</u>**

संदर्भ :– १) उरुळी व फुरसुंगी ग्रामस्थांनी दि. १३/५/२००९ रोजी ग्रामसभेद्वारे केलेली मागणी.
२) दि. १४/५/२००९ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीमधील निर्णय.
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/५१, दि. १४/५/२००९ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ११३, दि. १५/५/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

ऊरुळी देवाची, फुरसुंगी या गावात विविध विकासाची कामे मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ८९ अन्वये करण्यासाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) देवाची ऊरुळी, फुरसुंगी या गावात विविध विकासाची कामे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ कलम ८९ अन्वये करणेस
२) मौजे देवाची उरुळी व फुरसुंगी ग्रामसभेद्वारे मागणी करतील व मा.जिल्हाधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे शिफारशीनुसार व प्राधान्यक्रमाने विविध विकास कामे करणेस
३) विविध विकास कामांची पुणे महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करणेस

**<u>विषय क्रं. ४/११</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उका /से/२६, दिनांक १८/४/२००९ चे पत्र.
२) मा. रशिद शेख व मा.दिपक मानकर, मा.दिपक बोडके, मा.किरण बारटक्के यांचे दि. १२/५/२००९ ची उपसूचना.
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७, दि. १२/५/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे व शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार–

त्यांच्याकडे सोपविण्यात यावी. त्याची एक प्रत सोबत जोडली आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | सेवकाचे नांव | जातीचा गट | सहाय्यक विभागीय अधिकारी पदावरील नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|
| १) | श्री.रणपिसे प्रशांत दादाराम | अजा | १/ १० /२००५ |

**विषय क्रं. ५/१२**

संदर्भ :- १) मा. दिपक मानकर व मा. शंकर केमसे यांचे दि.११/ ५ /२००९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३१, दि. १२/५/२००९.

---

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेनुसार –

पुणे जिल्हया मधील जुन्नर तालुका येथील शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. राष्ट्रमाता जिजाऊ यांनी त्यांचेवर बालसंस्कार घडवून संपुर्ण भारत वर्षात प्रथमत: स्वराज्याची मुहुर्तमेढ पुण्यामध्ये केली. ही बाब निश्चितच पुणे शहरास अभिमानस्पद आहे. तथापी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यनगरीमध्ये त्यांचे उचित स्मारक नसावे हे ऐतिहासिक पुणे शहरास भूषणावह नाही. यास्तव सर्व भारत वर्षाचे दैंवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक पुण्यामध्ये उभे रहावे यासाठी एका शिवसृष्टीची उभारणी केली जावी. यासाठी स्थायी समितीची शिवसृष्टी संदर्भात मंजूरी मिळाली असून व बजेट मध्ये सुरूवातीला १७ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरील शिवसृष्टीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मा पासून ते मृत्यू पर्यंतचा संपूर्ण इतिहास दाखविला जाणार आहे. तो सर्व जगाला प्रेरणादायी ठरणार असून, हा प्रोजेक्ट म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार आहे. या प्रोजेक्टचे सर्व काम प्रसिध्द दिग्दर्शक श्री.नितीन देसाई करणार आहेत.

यासाठी कोथरूड स.नं.९२, ९३ येथील २८ एकर पाच गुंठे ही जागा कचरा डेपोसाठी आरक्षित असून, ही जागा पुणे मनपाच्या ताब्यात आहे. सदर ठिकाणच्या आरक्षणामध्ये बदल करून त्या ठिकाणी शिवसृष्टी साठी सिव्हीक ॲन्ड कल्चर (CC) आरक्षित करण्यास व यासाठी १९६६ चे कलम ३७ ( १ ) ची कारवाई करून अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्रं. ६/१३**

संदर्भ :- १) मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. म.आ./शिक्षणाधिकारी ४५, दि. ६/५/२००९ चे पत्र.

२) मा. मुख्य सभा ठ. क्र. १८७, दि. १३/८/२००४.

३) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ८, दि. १३/५/२००९.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक शाळा इमारतीचे खाजगी संस्थेमार्फत नुकतेच नुतनीकरण करण्यात आलेले आहे.शाळेची इमारत प्रशस्त आहे. वर्ग खोल्यांची संख्याही भरपूर आहे. या ठिकाणी नवीन रात्र प्रशाला सुरू केल्यास शासनाकडून कायम स्वरूपी विनाअनुदान तत्वावर शाळा सुरू करण्यास मान्यता मिळेल. सर्व खर्च मनपास सोसावा लागेल तशी दरवर्षीच्या अंदाजपत्रकात तरतुद करावी लागेल. हा खर्च दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. म्हणून सदर ठिकाणी नवीन रात्र प्रशाला सुरू करणे संयुक्तीक वाटत नसल्यामुळे जून २००९ पासून पुणे मनपा संचलित नि.वा.किंकर रात्र प्रशाला नाना वाडा, बुधवार पेठ पुणे – २ या रात्र शाळेचे नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालय येरवडा पुणे – ६ येथे स्थलांतर करणे आवश्यक

शैक्षणिक दर्जाही वाढलेला आहे.

तरी वरील बाबींचा विचार करता पुणे म.न.पा.नी.वा.किंकर रात्र प्रशाला नानावाडा, बुधवार पेठ पुणे –२ ही रात्र प्रशाला येरवडा पुणे–६ नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालय येथे स्थलांतरास माध्यमिक शाळा संहिता ७.६ नुसार मे.राज्य शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे, त्यामुळे सदर शाळा स्थलांतरास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ७/१४</u>**

संदर्भ :– १) मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. म.आ./ शिक्षणाधिकारी ४६, दि. ६/५/२००९ चे पत्र.
२) मा.मुख्य सभा ठ.क्र.१०७, दि. २४. ६. १९९६.
३) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. ९, दि. १३/५/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

कै.गैनबा सोपान मोझे माध्यमिक शाळेचे स.नं.१०/१२, लक्ष्मीनगर येरवडा पुणे ६ येथून वर नमूद केल्याप्रमाणे टिंगरे नगर परिसरात स्थलांतर केल्यास शाळेची पटसंख्या व शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होईल. सरस्वती विद्यामंदिर शाळा क्र.१०२ जी व २०६ बी या ठिकाणी माध्यमिक शाळेसाठी पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध आहेत. महानगरपालिकेवर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. शासनाच्या व पुणे महानगरपालिकेच्या होणा–या खर्चाचा जास्त व चांगला विनीयोग होईल. गेनबा सोपान मोझे शाळेतील इ.८वी, इ.९ वी व इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना जवळच्या नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक शाळेत प्रवेश देता येईल. यापुर्वी नानावाडा बुधवार पेठ, पुणे २ येथील १) डॉ.नानासाहेब परूळेकर विद्यालय २) कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय या माध्यमिक शाळांचे विश्रांतवाडी व नवी खडकी येरवडा पुणे ६ येथे अशाच प्रकारे स्थलांतर करण्यात आलेले आहे. या शाळांचे स्थलांतर केल्यामुळे पटसंख्या वाढलेल्या आहे. तसेच शैक्षणिक दर्जाही वाढलेला आहे.

तरी वरील बाबींचा विचार करता पुणे महानगरपालिकेचे कै.गेनबा सोपान माध्यमिक विद्यालय स.नं.१०/१२ लक्ष्मीनगर येरवडा पुणे ६ या शाळेचे टिंगरेनगर परिसरातील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर शाळा क्र.१०२ जी व २०६ बी येथे स्थलांतरास माध्यमिक शाळा संहिता ७.६ नुसार मे.राज्य शासनाचे मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सदर शाळा स्थलांतरास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ८/१५</u>**

संदर्भ :– १) मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/उकाजा/से/४८, दि.६/५/२००९ चे पत्र.
२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्र. १०, दि. १३/५/२००९.

–––

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे मनपाच्या आरोग्य खात्याकडील मलेरिया सर्व्हेलन्स इन्स्पेक्टर ( वे.श्रे.रू.४३०० ते १००४५ + मान्य भत्ते ) या हुद्यांच्या रिक्त जागांवर बढतीने नेमणूका करणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादी /प्रतिक्षायादीस तसेच त्यावरील सेवकांना दिलेला क्रम, मागासवर्गीय अनुशेष/आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश इ.सेवकवर्ग विषयक बाबींचा विचार करून मा.महा.आयुक्त यांनी वेळोवेळी बढतीने नेमणुका करणेस मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>निवडयादी</u>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | श्री.राजेंद्र किसन सावंत | मलेरिया इन्व्हेस्टीगेटर /सर्व्हेलन्स वर्कर ( वे.श्रे.३०५० ते ७१५० + मान्य भत्ते ) | २१/२/२००४ | अ.जा. |
| ३) | श्री. अर्जुन दत्तू चव्हाण | मलेरिया इन्व्हेस्टीगेटर /सर्व्हेलन्स वर्कर ( वे.श्रे.३०५० ते ७१५० + मान्य भत्ते ) | १३/१/२००५ | अ.जा. |
| ४) | श्री. पांडूरंग रामचंद्र पिसाळ | मलेरिया इन्व्हेस्टीगेटर /सर्व्हेलन्स वर्कर ( वे.श्रे.३०५० ते ७१५० + मान्य भत्ते ) | १३/१/२००५ | भज – क |
| ५) | श्री.विक्रम सदाशिव शिंदे | सुपीरियर फिल्ड वर्कर (वे.श्रे.२९५५ ते ५९६०+ मान्य भत्ते ) | १४/२/१९८६ | अ.जा.सेवाज्येष्ठतेनुसार |
| ६) | श्री. शाम आबू माने | सुपीरियर फिल्ड वर्कर ( वे.श्रे.२९५५ ते ५९६० + मान्य भत्ते ) | १२/१२/९४ | विजा – अ |

**प्रतिक्षायादी**

| **अ.क्र** | **सेवकाचे नाव** | **सध्याचा हुद्दा व वेतनश्रेणी** | **मनपातील नेमणूक दिनांक** | **जातीचा गट** |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.रामचंद्र वसंत भुतकर | मलेरिया इन्व्हेस्टीगेटर /सर्व्हेलन्स वर्कर ( वे.श्रे.३०५० ते ७१५० + मान्य भत्ते ) | २०/२/२००४ | खुला |

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**